Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 20 December 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – २० डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणी दुहेरी चौकशीसह मकोकाअंतर्गत कारवाई तर परभणीतल्या संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित-एक देश एक निवडणूक विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय
- मुंबईत बांधकामाच्या राडारोड्यावर पुनर्प्रक्रिया प्रकल्प तर नागपुरात पिकांच्या अवशेषापासून तयार रस्त्याचं उद्या लोकार्पण

आणि

- महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या १२४ व्या दीक्षांत सोहळ्यात ६२० उपनिरीक्षकांची तुकडी पोलीस दलात दाखल

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणी दुहेरी चौकशीसह मकोकाअंतर्गत कारवाई तर परभणीतल्या संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या दोन्ही घटनांसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला ते आज उत्तर देत होते. बीड जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोषी कोणीही असले, तरीही मकोका अंतर्गत कारवाई करून बीड जिल्ह्यांतील भूमाफिया, वाळूमाफियांविरोधात संघटीत गुन्ह्याअंतर्गत कारवाई करू, अशी स्पष्ट भूमिकाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली. ते म्हणाले –

***या निमित्ताने या सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो, आज जो काही गुन्हा घडला आहे याचा मास्टरमाईंड कोणीही असला तरी, त्याच्यावर कारवाई केली जाईल. आपण वारंवार वाल्मिक कराडचं नाव घेतलं म्हणून नाव घेऊन सांगतो, जर वाल्मिक कराड बद्दलचे पुरावे असतील, तर तो कोण आहे, कुठल्या पक्षाचा आहे, कुणाकुणासोबत फोटो आहे याचा विचार न करता कारवाई केली जाईल. या सगळ्या प्रकरणांमध्ये कुठेतरी पोलीस प्रशासनाची कुचराही दिसत असल्यामुळे बीडच्या एस पीं ना ट्रान्सफर करण्याचा निर्णय हा या ठिकाणी मी घेतलेला आहे.***

या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाईल तसंच विशेष तपास पथकामार्फतही संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाणार असल्याचं, फडणवीस यांनी सांगितलं.

***या प्रकरणांमध्ये दोन प्रकारची चौकशी आम्ही करणार आहोत. एक आईजी लेवल अधिकारी, यांच्या अंतर्गत एसआयटी तयार केलेली आहे. ही एसआयटी या प्रकरणाची पूर्ण चौकशी करेल. आणि दुसरीकडे, कारण शेवटी एसआयटी चौकशी करताना गुन्ह्याच्या अनुषंगाने करते, ईकोसिस्टीमच्या अनुषंगाने चौकशी झाली पाहिजे म्हणून न्यायालयीन चौकशी देखील या संपूर्ण प्रकरणाची केली जाईल.***

परभणी इथं घडलेली पहिली अप्रिय घटना ही ज्या व्यक्तीनं केली, ती मनोरुग्ण असल्याचा स्पष्ट वैद्यकीय अहवालही उपलब्ध असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी अतिरिक्त पोलीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. या दरम्यान, न्यायालयीन कोठडीत दगावलेले सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे नव्हे तर श्वसनाच्या विकाराने झाल्याचं उत्तरीय तपासणीतून स्पष्ट झाल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. मृत सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीची घोषणाही त्यांनी केली.

***अशोक घोरबांड यांना सस्पेंड करून याची चौकशी पूर्णपणे केली जाईल की त्यांनी वाजवीपेक्षा अधिक बळाचा वापर केला आहे का? ज्यावेळी सगळी जाळपोळ चालू होती, त्यामुळे जाळपोळीच्या व्हिडिओमध्ये जी मंडळी दिसतात त्यांना अटक करण्यात आली, त्यात सूर्यवंशी नाटक करण्यात आली होती. ते पूर्णवेळ पोलीस कस्टडीत असताना चे व्हिडिओ फुटेज उपलब्ध आहेत, अनएडिटेड. या पूर्ण व्हिडिओ फुटेज मध्ये कुठेही त्यांना मारहाण केल्याचं दिसत नाही. त्यांना सीओपीडी म्हणजे श्वसनाचा दुर्धर आजार आहे आणि ब्रेथलेसनेस आहे असं त्यांच्या मेडिकल एक्झामिनेशन मध्ये लिहिलेलं आहे. तथापि, त्यांच्या कुटुंबाला दहा लाख रुपयांची मदत ही राज्य सरकारच्या वतीने केली जाईल आणि या सगळ्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाईल.***

परभणी इथल्या घटनेच्या वेळी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारे आंबेडकरवादी कार्यकर्ते मृत विजय वाकोडे यांच्या कुटुंबालाही पाच लाख रुपयांची मदत फडणवीस यांनी जाहीर केली आहे.

****

विधानसभेने संमत केलेलं महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक २०२४, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर सुधारणा आणि विधीग्राह्यिकरण विधेयक २०२४ आज विधान परिषदेनेही संमत केलं. हे विधेयक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सभागृहात मांडले. गेल्या वर्षी राज्याने अडीच लाख कोटी रुपयांचा जीएसटी वसूल करत देशात प्रथम स्थान पटकावले असल्याचं यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. जीएसटीमधील चोऱ्या पकडण्यासाठी कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

****

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आज लोकसभेत गदारोळ केला. या गदारोळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली दोन विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा

प्रस्ताव विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी मांडला. यानंतर लोकसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेचं कामकाज सुरू होताच दोन्ही बाजूच्या सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केल्यानं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब झालं. त्यानंतर कामकाज पुन्हा सुरू झाल्यावरही गदारोळ सुरूच होता, त्या गदारोळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली दोन विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यानंतर सभापती जगदीप धनखड यांनी राज्यसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केलं.

दरम्यान, या अधिवेशनात लोकसभेची कार्यक्षमता ५४ टक्के तर राज्यसभेची कार्यक्षमता ४० टक्के राहिली, प्रत्येक संसद सदस्याने याचा विचार करायला हवा, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे.

****

बृहन्मुंबई महानगरपालिकेनं घरगुती स्तरावरील बांधकाम आणि पाडकाम यातून निर्माण होणाऱ्या राडारोड्यावर शास्त्रोक्त पद्धतीनं पुनर्प्रक्रिया करुन ते वापरायोग्य करण्यासाठीचा प्रक्रिया प्रकल्प दहिसर इथं उभारला आहे. राडारोड्यावर शास्त्रोक्त प्रक्रियेतून तयार होणारे वाळूसदृश्य घटक हे पेवर ब्लॉक, दुभाजक, पदपथांसाठी लागणारे दगड तसंच बसण्यासाठीची बाकं तयार करण्यासाठी वापरात आणले जात आहेत.

****

देशातल्या पहिल्या बायो बिट्टूमेन या जैविक रसायनावर आधारित राष्ट्रीय महामार्गाचं उद्या नागपुरात केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. पिकांच्या अवशेषांपासून बनवलेल्या बिट्टूमेनचा वापर करून मनसर–नागपूर हा वळणरस्ता तयार करण्यात आला आहे. हा याप्रकारचा देशातला पहिलाच राष्ट्रीय महामार्ग आहे.

****

महाराष्ट्र पोलीस अकादमीचा १२४ वा दीक्षांत सोहळा आज नाशिक इथं पार पडला. नाशिकचे प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधिश श्रीचंद जगमलानी यावेळी उपस्थित होते. प्रशिक्षण पूर्ण केलेले ४१० पुरूष आणि २१० महिला उपनिरीक्षकांची तुकडी पोलीस दलात दाखल झाली. सिंधुदुर्ग, धाराशिव, पुणे,

सातारा आणि नागपूर इथल्या बालगृहातून बाहेर पडलेल्या पाच अनाथ वंचित तरुणांचा या तुकडीत समावेश आहे.

****

शून्य कुष्ठरुग्ण प्रसार अभियानांतर्गत जालना जिल्ह्यात कुष्ठरुग्णांचा शोध घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून कुष्ठमुक्त सुरक्षित अभियान 'कुसुम' मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेत जिल्ह्यातल्या ७४ रुग्णांसह नव्या २० रुग्णांची नोंद झाली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी ही माहिती दिली. त्या म्हणाल्या–

> ***जालना जिल्ह्यामध्ये कुष्ठरोगमुक्त सुरक्षित महाराष्ट्र ही मोहीम दिनांक १६ डिसेंबर ते २० डिसेंबर या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये जालना जिल्ह्यामध्ये एकूण ७४ कुष्ठरूग्ण आढळून आलेली आहेत. ही मोहीम प्रामुख्याने वीटभट्टी कामगार, त्याच्यानंतर खाम कामगार, तसेच ऊसतोड कामगार या भागांमध्ये काम करणाऱ्या मजुरांची तपासणी करून रूग्ण सापडतात का या उद्देशाने राबवण्यात येत आहे. आणि आत्तापर्यंत वीस रूग्ण या मोहिमेमध्ये शोधण्यात आलेले आहेत.***

या मोहिमेत २१४ उपेक्षित ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित केलं जाणार आहे. रुग्णांच्या तपासणीसाठी आरोग्य विभागाची १२३ पथके तयार करण्यात आली असून, या पथकांवर आठ पर्यवेक्षकांचं निरीक्षण असणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राष्ट्रीय कुष्ठरोग निमुर्लन मोहिमेत वीट भट्टी कामगार, बांधकाम मजूर, कारागृहातील कैदी, आश्रम शाळेतील विद्यार्थी, ऊस तोड कामगार अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांची तपासणी करण्यात आली. जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ विशाल बेंद्रे यांनी ही माहिती दिली.

****

धाराशीव तालुक्यातील वर्ग २ मधील मदतमाश जमिनी वर्ग १ मध्ये करण्याच्या कामकाजासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. तहसील कार्यालयात दर बुधवारी या समितीचे शिबिर होणार असल्याची माहिती तहसीलदार डॉ.मृणाल जाधव यांनी दिली.

****